**UMED - MAHARASHTRA STATE RURAL LIVELIHOODS MISSION**
**उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष,
सिडको भवन, ५ वा मजला (दक्षिणकक्ष)
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
पिनकोड ४००६१४
दूरध्वनी : ०२२-२७५६२५५२/५४

State Mission Management Unit
CIDCO Bhavan, 5th Floor (South Wing),
CBD Belapur, Navi Mumbai
Pincode : 400614
Phone : 022-27562552/54

उमेद-एमएसआरएलएम/KM/२०२२/12399
दिनांक : १८/०५/२०२२

**प्रति,**
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, तथा
जिल्हा अभियान संचालक,
म.रा.ग्रा.जी.अ. (सर्व)

**विषय: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत यशकथा दृकश्राव्य माध्यमातून प्रसारित व्हाव्यात व चित्रफितींचे एकत्रित संकलन व्हावे या हेतूने राज्यस्तरीय लघुपट, माहितीपट आणि चित्रफित निर्मिती स्पर्धेचे आयोजन करणेबाबत...**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राज्यभर स्वयं सहाय्यता गटाच्या महिलांनी वैयक्तिक किंवा सामूहिकरित्या अनेक प्रकारचे व्यवसाय उभे केले आहेत. स्वयंसहाय्यता गटांनी विविध प्रकारच्या राष्ट्रीय व सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन अनेक प्रकारचे उपक्रम यशस्वी केले आहेत. अनेक ग्रामीण महिलांचे कर्तृत्व या अभियानातून स्पष्टपणे दिसून आले आहे. या सर्व बाबींचे दृकश्राव्य स्वरुपात दस्ताऐवजीकरण होण्यासाठी राज्यस्तरीय लघुपट, माहितीपट आणि चित्रफित निर्मितीची भव्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त सहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या तसेच स्पर्धा यशस्वी करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरून जिल्हा अभियान कक्षाला द्याव्यात, ही विनंती

**सोबत :** स्पर्धेच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना, हमीपत्र नमुना, संमतीपत्र नमुना आणि प्रवेशपत्र

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

**प्रत:**

१. **जिल्हा प्रकल्प सहसंचालक तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव**
२. **जिल्हा अभियान व्यवस्थापक यांना तत्काळ कार्यवाही करून अनुपालन अहवाल सदर करणे बाबत**

# उमेद - लघुपट आणि माहितीपट स्पर्धा

## मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान्नामध्ये मागील 10 वर्षात अनेक यशस्वी उपक्रम राबविले गेले आहेत.महाराष्ट्राच्या ग्रामीण महिलांच्या जगण्यामध्ये परिवर्तन दिसून येत आहे.आत्मनिर्भर महिलांच्या हजारो यशकथा समोर येत आहेत. MSRLM च्या अंतिम ध्येयाप्रमाणे प्रत्येक ग्रामीण महिलांना किमान रु. 10000 पेक्षा जास्त उत्पन्न झाले पाहिजे. अजूनही अनेक महिलांना उपजीविका साधन उभा करता आलेले नाही. अशा सर्व महिलांना राज्यातील यशवी महिलांच्या दृकश्राव्य स्वरूपातील कथा सर्व महिलांना उपलब्ध व्हायला हव्यात. यासाठी राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरावर लघुपट किंवा माहितीपट उपलब्ध असणे आवश्यक आहे. उत्तम दर्जाच्या चित्रफिती उपलब्ध असल्यास अभियानाच्या सामाजिक माध्यमांच्या व्यासपीठावरून सातत्याने वापर करता येईल. अशा चित्रफिती प्रत्येक स्वयंसहायता समूहाकडे उपलब्ध असल्यास महिलांची क्षमता बांधणी होण्यास मदत होईल. इतर प्रेरणादायी कथा पाहून नवीन उमेद जागृत होण्यास मदत मिळेल. सद्यस्थितीत यशकथा मांडणारे व्हिडीओज अभियानाकडे उपलब्धच नाहीत. चित्रफिती उपलब्ध करण्यासाठी राज्यभरातल्या व्यावसायिक आणि हौशी चित्रफित निर्माते, व्हिडीओ निर्माते, YouTube Vloger यांच्यासाठी अभियानातील यशकाथांवर आधारित लघुपट, माहितीपट आणि चित्रफित स्पर्धा आयोजित करणे उपयुक्त आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनातून राज्यस्तरावर अभियानांसंबंधी व्हिडीओची बँक तयार होईल आणि दृकश्राव्य दस्ताऐवजीकरण होण्यासही मदत मिळेल.

➢ **स्पर्धेचा उद्देश :**

1) राज्यातील ग्रामीण क्षेत्रात महिला बचत गटांच्या शश्वत स्वरुपात उभ्या राहिलेल्या उद्योग व्यवसाय यांचे व्हिडीओ डॉक्युमेंटेशन करणे
2) यशस्वी महिलांच्या यशकथा चित्रित होऊन त्या राज्यभर शेअर करणे
3) राज्यस्तरावर व्हीडीओ बँक तयार करणे
4) दीन दयाळ अंत्योदय राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात दृकश्राव्य क्षेत्रातील कल्पक कलाकारांचा सहभाग वाढविणे

➢ **स्पर्धेचा कालावधी :**

01 जून ते 30 जून 2022

- दिनांक 22 मे ते 31 मे पूर्व प्रसिद्धी आणि पूर्वतयारी
- दिनांक 1 जून ते 15 जून 2022 या कालावधीत प्रत्यक्ष लघुपट, चित्रफित किंवा माहितीपट निर्मिती करणे.
- 15 जून ते 20 जून 2022 या कालावधीत जिल्हास्तरावर छाननी करून 5 उत्कृष्ट स्पर्धकांची निवड करून राज्यस्तरावर पाठविणे.
- 22 ते 30 जून 2022 दरम्यान राज्यस्तरावर स्पर्धेचे परीक्षण.

➢ **स्पर्धा आयोजनासाठीचे नियोजन :**

- राज्यस्तरावरून स्पर्धेची घोषणा करणे
- स्पर्धेची राज्य आणि जिल्हा स्तरावरून विविध माध्यमाद्वारे प्रसिद्धी करणे
- लघुपट निर्मिती करणाऱ्यांना स्पर्धेत सहभागी करून घेण्यासाठी जिल्हास्तरावरून माहिती देण्याचा उपक्रम आयोजित करणे.
- उत्कृष्ट काम असणाऱ्या आणि राज्यस्तरावरून ठरवून दिलेल्या विषयांच्या अनुषंगाने जिल्ह्यातील बचत गट, ग्राम संघ आणि प्रभाग संघ यांची निवड करणे व लघुपट निर्मिती करणाऱ्यांशी समन्वय ठेऊन चित्रीकरणास मदत करणे
- स्पर्धकांनी तयार झालेले लघुपट राज्यस्तरावर पाठविणे.
- राज्यस्तरावरून सर्व स्पर्धकांच्या लघुपटांचे संकलन करून परीक्षण करणे
- विजेत्या स्पर्धकांची नावे घोषित करणे.
- राज्यस्तरावर बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करणे

➢ **स्पर्धेसाठी प्राथमिक नियमावली** :

- तयार लघुपट, माहितीपट किंवा चित्रफितीचा कालावधी अधिकाधिक 7 मिनिटे असावा
- चित्रीकरणाचा दर्जा उच्चतम असावा किमान HD मध्ये चित्रीकरण असावे.
- स्पर्धेसाठी सादर केलेले व्हिडिओ हे सार्वत्रिक वापरासाठी उपयुक्त असणाऱ्या प्रकारात (Format) असावेत
- स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकाला प्रवेशपत्र भरून देणे अनिवार्य असेल.
- लघुपट निर्मिती करण्यासाठी व्यावसायिक निर्माते, हौशी चित्रफित निर्माते, YouTube Vloger स्वयंसहायता बचत गट, ग्राम संघ, प्रभाग संघ, ग्राम पंचायत, सामाजिक संस्था,राज्याचा कुणीही नागरिक हे सर्वजन स्पर्धक म्हणून सहभागी होऊ शकतील.

- या स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छित असलेल्या स्पर्धकांनी लघुपट, चित्रफित किंवा माहितीपट सदर करताना त्याचा मजकूर हा शासनाच्या धोरणाच्या आणि भूमिकेशी सुसंगत असावा. कुठल्याही प्रकारे सामाजिक भावना दुखावणार नाहीत याची दक्षता घ्यावी. आक्षेपार्ह मजकुरासाठी स्पर्धक जबाबदार असतील.
- या स्पर्धेसाठी सदर केलेल्या व्हिडीओ हा स्पर्धेच्या निकालापूर्वी कसल्याही प्रकारे समाज माधामात किंवा कुठेही प्रदर्शित करण्यास परवानगी नसेल. या स्पर्धेच्या नावाने तयार करण्यात आलेल्या व्हिडीओ च्या मजकुराची जबाबदारी पूर्णत: स्पर्धकाची असेल.
- स्पर्धेच्या परीक्षनापुर्वी जर समाज माध्यमात किंवा इतर कुठेही स्पर्धेत सहभागी झालेल्या लघुपट, चित्रफित किंवा माहितीपटाचा मजकूर प्रदर्शित झालेला आढळल्यास स्पर्धक आपोआप बाद ठरेल.
- स्पर्धकांनी सहभागी होण्यासाठी अभियानाच्या तालुका कक्षाला किंवा जिल्हा कक्षाला अवगत करणे आवश्यक असेल. त्याचप्रमाणे यशकथा तालुका किंवा जिल्हा कक्षात चर्चा करून नक्की करता येईल. याकामी जिल्हा आणि तालुका कक्षातून मदत केली जाईल.
- ज्या स्वयंसहाय्यता गटाची किंवा वैयक्तिक महिलेची यशकथा स्पर्धकाकडून निवडली जाईल त्या गटाची किंवा महिलेची परवानगी लिखित स्वरुपात निश्चित करून दिलेल्या नमुन्यात घेण्यात यावी.
- ज्या गावात लघुपट, चित्रफित किंवा माहितीपट तयार करण्यासाठी छायाचित्रण करायचे असेल त्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, सरपंच आणि गावातील प्रमुख मान्यवर यांना स्पर्धकांनी लेखी पूर्वकल्पना देणे अनिवार्य असेल.
- स्पर्धकांनी जिल्हा आणि तालुका कशाला पूर्वकल्पना दिल्यानंतर कक्षातून स्पर्धकाला अभियानाविषयी, त्या त्या जिल्ह्यातील किंवा तालुक्यातील यशस्वी स्वयंसहाय्यता गटाविषयी, यशस्वीरीत्या आणि शश्वत स्वरुपात उपजीविका उपक्रम चालवत असलेल्या स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांची माहिती, स्वयंसहाय्यता गटाच्या विशेष आणि दखलपात्र उपक्रमांची माहिती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी तालुका आणि जिल्हा कक्षाची असेल.
- स्पर्धेत सहभागी होऊन व्हिडिओ /चित्रफित / माहितीपट महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाकडे सदर झाल्यानंतर या सर्व व्हिडिओ /चित्रफित / माहितीपट यावर मालकी हक्क महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाकडे जाईल. कॉपीराईट कायद्याप्रमाणे सर्व हक्क अभियानाकडे राहतील.
- स्पर्धेसाठी व्हिडीओ सादर करताना पेन ड्राईव्ह मध्ये सदर करावा. सदर करताना तांत्रिक योग्यता तपासून सादर करावे जसे कि, दर्जा HD प्रकारचा असावा. व्हिडीओ MP४ किना तत्सम फील मध्ये कन्व्हर्ट केलेला असावा

- **लघुपटनिर्मितीसाठी विषय** :
  - स्वयंसहाय्यता महिला बचतगटाचे आदर्श काम
  - उत्कृष्ट ग्रामसंघ
  - उत्कृष्ट प्रभाग संघ
  - बचत गटाचा शास्वत व्यवसाय
  - बचत गटाच्या शास्वत व्यवसायासह गटाचे सामाजिक योगदान
  - बचत गच्या एकत्रित कामातून मोठ्या अडचणीवर केलेली मात
  - बचत गटाचा नाविन्यपूर्ण व्यवसाय
  - बचतगटाचा त्याच भागाच्या कच्च्या मालावर आधारित यशस्वी उद्योग
  - बचत गटाच्या मदतीने सदस्य महिलांची बिकट परिस्थितीवर मात
  - RSETI च्या माध्यमातून तरुणांना मिळालेला स्वयंरोजगार
  - बँक आणि बचत गट यांच्या समन्वयातून शास्वत रोजगार निर्मिती
  - स्वयंसहायता गटातील महिलांच्या शेतीपूरक उपजीविका साधनातून परिवर्तन
  - स्वयंसहायता गटातील महिलांच्या बिगर शेतीपूरक व्यवसाय निर्मिती.
  - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील (उमेद) परिणामकारक यशकथा.

- **स्पर्धेचे परीक्षण :**
  - स्पर्धेचे अंतिम परीक्षण राज्यस्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM यांनी निवडलेल्या समितीकडून होईल
  - जिल्हास्तरावरून प्राप्त झालेल्या व्हिडीओज् ची छाननी होईल.
  - जिल्हास्तरावर छाननी समिती स्थापन करणे आवश्यक असेल यामध्ये व्हिडीओज् निर्मितीबद्दल उत्तम ज्ञान असलेल्या अशासकीय सदस्यांची निवड करावी.
  - जिल्हास्तरावरून सर्वोकृष्ट 5 व्हिडीओज् राज्यस्तरावर पाठविण्यात येतील.
  - राज्यस्तरावर परीक्षणासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येईल.

- **जिल्हास्तरावर सन्मानपत्र :**
  - जिल्हास्तरावर सर्व स्पर्धकांच्या व्हिडीओजची छाननी झाल्यावर जे अंतिम सर्वोत्कृष्ट 5 व्हिडीओ निवडले जातील त्या 5 स्पर्धकांना जिल्हास्तरावरून सन्मानपत्र प्रदान करावे.

- **स्पर्धेची व्यापक प्रसिद्धी :**
  - स्पर्धा घोषित झाल्यानंतर राज्यस्तरावरून आणि जिल्हास्तरावरून स्पर्धेची सर्व प्रकारच्या माध्यमांचा उपयोग करून व्यापक प्रसिद्धी करण्यात येईल.
  - व्हिडीओज् तयार करणारे निर्माते, हौशी कलाकार, YouTube Vloger आणि स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणारे व्यक्ती किंवा संस्था यांना निमंत्रित करून बैठक घेणे.
  - स्थानिक वर्तमानपत्रात स्पर्धेविषयी माहिती देणाऱ्या बातम्या वारंवार प्रकाशित करणे.

## ➢ जिल्हा अभियान व्यवस्थापन  कक्षाची जबाबदारी

- स्पर्धा नाविन्यपूर्ण प्रकारची असल्याने या स्पर्धेला प्रतिसाद मिळविणे आवश्यक आहे.
- स्थानिक वर्तमानपत्रातून,सामाजिक माध्यमातून व इतर सर्व उपलब्ध माध्यमातून या स्पर्धेची व्यापक प्रसिद्धी घडवून आणणे.
- या प्रकारचे व्हिडीओ निर्मिती क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांपर्यंत पोहोचणे आवश्यक असेल.
- यानिमित्ताने अभियानातील यशकथा दृकश्राव्य स्वरुपात जिल्हा आणि राज्य स्तरावर एकत्रित होतील.
- हे सर्व माहितीपत/ लघुपट/ व्हिडीओ पुढील कालावधीत उपयुक्त ठरणार असल्याने जिल्हास्तरावर किमान 15 स्पर्धक सहभागी होणे अपेक्षित आहे.
- सहभागी स्पर्धकांना व्यवस्थित मार्गदर्शन करणे, यशकथा निवडण्यासाठी मदत करणे तसेच छायाचित्रणासाठी सहकार्य करणे या प्रकारच्या सर्व जबाबदाऱ्या जिल्हा अभियान कक्षाच्या असतील.
- जिल्हा अभियान व्यवस्थापक यांनी या स्पर्धेच्या समन्वयासाठी आणि यशस्वीतेसाठी जिल्हास्तरावर  या स्पर्धेचे समन्वयक म्हणून स्पर्धेच्या कालावधीत काम करणे अपेक्षित आहे.
- जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षातील ज्ञान व्यवस्थापन चे काम पाहत असलेल्या व्यक्तीने या स्पर्धेच्या व्यापक प्रसिद्धीसाठी विशेष प्रयत्न करणे, स्पर्धकांना मार्गदर्शन करणे, स्पर्धकांनी सदर केलेल्या माहितीपत/ लघुपट/ व्हिडीओ यांची छाननी करण्यासाठी प्रमुख भूमिका निभावणे.

## ➢ स्पर्धेसाठी बक्षीस

- राज्यस्तरावर प्रथम -  रु. 3 लाख (तीन लाख) रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र
- राज्यस्तरावरून द्वितीय - रु. 2 लाख (दोन लाख) रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र
- राज्यस्तरावर तृतीय  - रु. 1 लाख (एक लाख) रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र
- राज्यस्तरावर उत्तेजनार्थ 50 हजार रोख, सन्मानचिन्ह

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## उमेद-लघुपट, माहितीपट किंवा चित्रफित स्पर्धा

## "प्रवेशपत्र"

➢ **स्पर्धक वैयक्तिक भाग घेणार असेल तर -**

**१) स्पर्धकाचे नाव :-**

**२) पत्ता :-**

**३) ओळखपत्र :- a) पॅनकार्ड b) आधारकार्ड c) वाहन परवाना d) पासपोर्ट**

**४) निवडलेला विषय :-**

**५) छायाचित्रणाचा गाव आणि परिसर :-**

**स्वाक्षरी**

**दिनाक :-**

**स्थळ :-**

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## उमेद-लघुपट, माहितीपट किंवा चित्रफित स्पर्धा

## "प्रवेशपत्र"

➢ **स्पर्धक संस्था म्हणून भाग घेणार असेल तर -**

१) **संस्थेचे नाव :-**

२) **संस्थेचा पत्ता :-**

३) **संस्थेचे कार्य (थोडक्यात) :-**

४) **नोंदणीकृत असल्यास त्यासंबंधीचा दाखला :-**

५) **निवडलेला विषय :-**

६) **छायाचित्रणाचा गाव आणि परिसर :-**

**स्वाक्षरी**

**दिनाक :-**

**स्थळ :-**

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## उमेद-लघुपट, माहितीपट किंवा चित्रफित स्पर्धा

## "हमीपत्र"

मी / आम्ही ------------------------------------------------------------------ या हमीपत्राव्दारे हमी देतो की महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत आयोजित केलेल्या लघुपट, माहितीपट किंवा चित्रफित स्पर्धेसाठी सादर केलेल्या चित्रफितीचा मजकूर शासनाच्या धोरणाशी आणि भुमिकेशी सुसंगत आहे. या मजकुरातून कुणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत. हा मजकूर असामाजिक किंवा व्देषभावना पसरविणारा नाही. या चित्रफितमध्ये महिलांच्या आत्मसन्मानाचा पुर्ण विचार केलेला आहे. त्याचप्रमाणे कसल्याही प्रकारची अश्लीलता किंवा दुहेरी संवाद उपयोगात आणलेले नाहीत. या सर्व बाबींची हमी देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मी/ आम्ही स्पर्धेसाठी सादर केलेल्या चित्रफितीवर कॉपीराईटच्या नियमाप्रमाणे संपुर्ण अधिकार हा महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचा राहील, ही बाब मला मान्य आहे.

स्पर्धकाचे नाव व सही

______________________________

दिनाक :-

स्थळ :-

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## उमेद-लघुपट, माहितीपट किंवा चित्रफित स्पर्धा

## "हमीपत्र"

मी / आम्ही ------------------------------------------------------------------ या हमीपत्राव्दारे हमी देतो की महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत आयोजित केलेल्या लघुपट, माहितीपट किंवा चित्रफित स्पर्धेसाठी सादर केलेल्या चित्रफितीचा मजकूर शासनाच्या धोरणाशी आणि भुमिकेशी सुसंगत आहे. या मजकुरातून कुणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत. हा मजकूर असामाजिक किंवा व्देषभावना पसरविणारा नाही. या चित्रफितमध्ये महिलांच्या आत्मसन्मानाचा पुर्ण विचार केलेला आहे. त्याचप्रमाणे कसल्याही प्रकारची अश्लीलता किंवा दुहेरी संवाद उपयोगात आणलेले नाहीत. या सर्व बाबींची हमी देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मी/ आम्ही स्पर्धेसाठी सादर केलेल्या चित्रफितीवर कॉपीराईटच्या नियमाप्रमाणे संपुर्ण अधिकार हा महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचा राहील, ही बाब मला मान्य आहे.

संस्थेचे नाव व स्वाक्षरी करणाऱ्याचे पद
(उपलब्ध असल्यास शिक्का)

दिनाक :-

स्थळ :-

# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## उमेद-लघुपट, माहितीपट किंवा चित्रफित स्पर्धा

## "संमतीपत्र"

मी/ आम्ही ---------------------------------------------------या संमतीपत्राव्दारे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत आयोजित केलेल्या लघुपट, माहितीपट किंवा चित्रफित स्पर्धेसाठी श्री. / श्रीमती -
---------------------------------------------- यांना माझी/ गटाची/ व्यवसायाची/ रोजगाराची माहिती छायाचित्रण करण्यास स्वेच्छेने संमती देत आहे / देत आहोत.

सदस्याचे/ स्वयंसहाय्यता समुहाचे नाव

________________________________

दिनाक :-

स्थळ :-